महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
जिल्हा माहिती कार्यालय, लातूर
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळ मजला, उत्तर बाजूस लातूर-4 135 12

वृत्तपत्राचे नाव : लोकमन                                   दिनांक : २९ ऑगस्ट २०२३

# लातूरमध्ये महिला आयोगाच्या सुनावणीत १३ तक्रारींचा निपटारा




लातूर,दि.२८: महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे कार्यालय मुंबई येथे असल्याने सर्वच महिलांना आपले प्रश्न आयोगाकडे मांडता येत नाहीत. त्यामुळे 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत राज्यातील २८ जिल्ह्यात महिला आयोग पोहचला आहे. या माध्यमातून जवळपास १८ हजार प्रकरणांमध्ये महिलांना न्याय मिळवून दिला गेला. महिलांच्या न्यायासाठी शासनानी केलेले कायदे महिलांपर्यंत जावेत, महिलांनी ते प्रयत्नपूर्वक समजून घेण्याचा प्रयत्न करावा, हेही या उपक्रमातून आम्ही सांगत आहोत, असे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत 'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमांतर्गत आज लातूर येथील नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात

**राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर**

आयोजित जनसुनावणीप्रसंगी श्रीमती चाकणकर बोलत होत्या. या जनसुनावणीमध्ये महिलांच्या १३ तक्रारी दाखल झाल्या. तीन पॅनलच्या माध्यमातून या तक्रारींवर सुनावणी घेवून त्याचा निपटारा करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात आली.

आमदार बाबासाहेब पाटील, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुनील यादव, निवासी

(पान ४ वर)

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
## जिल्हा माहिती कार्यालय, लातूर
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळ मजला, उत्तर बाजूस लातूर-4 135 12

**वृत्तपत्राचे नाव :** सिद्धेश्वर समाचार    **दिनांक :** २९ ऑगस्ट २०२३

लातूरमध्ये महिला आयोगाच्या सुनावणीत ९३ तक्रारींचा निपटारा

# राज्यातील २८ जिल्ह्यात जावून राज्य महिला आयोगाने महिलांच्या सुमारे अठरा हजार तक्रारींचा निपटारा केला

-राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर



लातूर, दि. २८ : महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे कार्यालय मुंबई येथे असल्याने सर्वच महिलांना आपले प्रश्न आयोगाकडे मांडता येत नाहीत. त्यामुळे 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत राज्यातील २८ जिल्ह्यात महिला आयोग पोहचला आहे. या माध्यमातून जवळपास १८ हजार प्रकरणांमध्ये महिलांना न्याय मिळवून दिला गेला. महिलांच्या न्यायासाठी शासनाने केलेले कायदे महिलांपर्यंत जावेत. महिलांनी ते प्रयत्नपूर्वक समजून घेण्याचा प्रयत्न करावा, तेही या उपक्रमातून आम्ही सांगत आहोत, असे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत 'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमांतर्गत आज लातूर येथील नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात आयोजित जनसुनावणीमध्ये श्रीमती चाकणकर बोलत होत्या. या जनसुनावणीमध्ये महिलांच्या ९३ तक्रारी दाखल झाल्या. तीन पॅनलच्या माध्यमातून या तक्रारींवर सुनावणी घेवून त्यांचा निपटारा करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात आली.

आमदार बाबासाहेब पाटील, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुनील यादव, निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी देवदत्त गिरी, महिला आयोगाचे समन्वयक श्री. गंगापुरे आदी यावेळी उपस्थित होते.

महिला सक्षम व्हाव्यात, यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे असून त्या स्वतःच्या पायावर स्वावलंबी झाल्या तर समाज म्हणून आपणही प्रगती करू, असे श्रीमती चाकणकर यावेळी म्हणाल्या. समाजात आजही बालविवाह, स्त्री-भ्रूणहत्या होत आहेत हे गंभीर असून याबाबतीत सर्वसामान्यांनी आपल्यापर्यंत तक्रारी द्याव्यात. लातूर जिल्हा प्रशासनाने याबाबतीत ग्रामपंचायत स्तरापर्यंतच्या यंत्रणेला असे विवाह रोखण्यासाठी आदेश काढावेत. एखादेवेळी नाही तर बालविवाह जिथे होतील, अशा मंगल कार्यालय, अशा लग्नाची पत्रिका छापणारे प्रिंटर्स यांच्यावरही कारवाई करावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

जिथे महिलांच्या विकासाला चालना दिली जाते, तेथे कुटुंब सर्व अर्थाने प्रगती करतात. महिलांनी सगळ्या क्षेत्रात त्यांच्याकडे असलेली गुणवत्ता सिद्ध करून दाखविली आहे. महिला आयोगाने प्रत्येक जिल्ह्यात जाऊन जनसुनावणी घेण्याचा हा उपक्रम घेतला आहे तो खूप कौतुकास्पद असल्याचे आमदार बाबासाहेब पाटील यांनी यावेळी सांगितले.

लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनीही यावेळी महिला आयोग महिलांसाठी सपोर्ट सिस्टिम म्हणून काम करत असल्याचे सांगून लातूर जिल्ह्यामध्ये 'माझी मुलगी- माझा सन्मान' योजना राबविणार असल्याचे सांगितले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा पोलीस अधिकारी सोमय मुंडे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.

**जनसुनावणीत ९३ तक्रारींचा निपटारा**

जनसुनावणीमध्ये एकूण ९३ तक्रारींवर सुनावणी घेण्यात आली. तीन पॅनलच्या माध्यमातून एकाच वेळी या सर्व तक्रारी निकाली काढण्याचा प्रयत्न केला. यात विविध तक्रारी आल्या त्यात महानगरपालिका हद्दीत बस स्टॉप असूनही सिटी बस थांबत नाहीत, कोर्टाने आदेश देऊनही पोटगी मिळत नाही, बेपत्ता मुलींच्या तक्रारी, सात - बाराचे नाव फसवणूक करून परस्परांनी हटवले, अशा विविध प्रकारच्या तक्रारी समोर आल्या. जिल्हाधिकारी, पोलीस, विधी व सेवा प्राधिकरण अशा संबंधित यंत्रणांकडे त्या सोपवून महिलांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला.

**महिलांसाठीच्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा**

यानंतर विविध विभागांतर्गत महिलांसाठीच्या योजनांची अंमलबजावणी, हिरकणी कक्ष, प्रत्येक कार्यालयात महिलांसाठी विशाखा समिती स्थापन करणे या संदर्भातील सादरीकरण झाले. यावेळी महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी देवदत्त गिरी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
जिल्हा माहिती कार्यालय, लातूर
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळ मजला, उत्तर बाजूस लातूर-4 135 12

वृत्तपत्राचे नाव :सकाळ　　दिनांक : २९ ऑगस्ट २०२३

# मुलींचे पळून जाण्याचे प्रमाण चिंताजनक

## चाकणकर : अल्पवयीन ठरतात भूलथापांचे बळी, घरोघरी संवाद वाढावा


रूपाली चाकणकर

लातूर, ता. २८ : राज्यात प्रेमप्रकरणातून मोठ्या ते अठरा या अल्पवयीन गटातील मुलींचे पळून जाण्याचे प्रमाण चिंताजनक आहे. या प्रकरणी पोलिस प्रशासन कारवाई करीत आहेच पण समाजाने विशेषतः पालकांनी आपल्या मुलींशी संवाद वाढवण्याची गरज आहे, असे मत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी येथे पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमानिमित्त त्या सोमवारी येथे आल्या होत्या. राज्यात विविध आस्थापनांत मोठ्या प्रमाणावर महिला काम करीत आहेत. तेथे त्यांचा शारीरिक किंवा मानसिक छळ होता कामा नये. त्यामुळे अशा ठिकाणी विशाखा समिती कार्यान्वित असाव्यात, यासाठी महिला आयोगाने भर दिला आहे. राज्यात प्रेमप्रकरणातून अल्पवयीन मुलींचे पळून जाण्याचे प्रमाण अधिक आहे. भूलथापांना त्या बळी पडत आहेत. एकत्र कुटुंब पद्धतीचा हा अभाव आहे. कुटुंबात संवादच राहिला नाही. त्यामुळे घरातील संवाद वाढवण्याची गरज आहे. शाळांमध्येही पालक, शिक्षक व मुले- मुली यांच्यातील संवादही वाढला पाहिजे. काय चांगले, काय वाईट हे त्यांना समजून सांगण्याची गरज आहे, असे त्या म्हणाल्या. गेल्या पंधरा महिन्यांपासून राज्य महिला आयोग प्रभावीपणे काम करीत आहे. महिलांसंदर्भातील अठरा हजार प्रकरणे निकाली काढली आहेत. पण महिलांवर अत्याचार होणार नाहीत, यासाठी समाजाने पावले उचलण्याची गरज आहे. अत्याचार झालेल्या महिलेसंदर्भात बॉंटची तातडीने अंमलबजावणी करावी, अशा सूचना दिल्या आहेत, असे चाकणकर म्हणाल्या.

जिल्ह्याचा आठ महिन्यांपूर्वी आढावा घेतला होता. काही त्रुटी होत्या. आज पुन्हा आढावा घेतला आहे. जिल्हा प्रशासन, पोलिस प्रशासनाने चांगले काम केल्याबद्दल चाकणकरांनी समाधान व्यक्त केले. आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनुराग सागर, पोलिस अधिक्षक सोमय मुंडे आदी उपस्थितीत होते.

### बालविवाह रोखण्यासाठी प्रभावी काम व्हावे

■ राज्यात कायदे चांगले आहेत पण ते मोडण्याचाच अधिक प्रयत्न होताना दिसत आहे. त्यामुळे जागृतीसाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे. राज्यात बालविवाह होत असून ते थांबविण्यासाठी संबंधित यंत्रणेने अधिक कार्यक्षमपणे काम करावे, अशा सूचना दिल्या आहेत, असे चाकणकर म्हणाल्या.

### 'गर्भलिंग निदान'चे असेही रॅकेट

■ गर्भलिंग निदान चाचणी करणारे रॅकेट सध्या कार्यरत आहेत. त्याला रुग्णालयात जायची गरज नाही. ब्रिफकेसमध्ये किट ठेवून गर्भलिंग निदान चाचण्यांची केंद्रे चालवली जात आहेत. अशी केंद्रे, अशा प्रकारांवर आरोग्य विभागाने लक्ष द्यावे. अधिकाऱ्यांनी चौकटीत राहून काम करण्यापेक्षा लोकांची कामे कशी होतील याकडे लक्ष द्यावे, अशा सूचना रूपाली चाकणकर यांनी बैठकीत दिल्या.